महाराष्ट्र शासन
**धर्मादाय सह आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे कार्यालय**

धर्मादाय सह आयुक्त भवन,सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय,बाबा पेट्रोल पंपाजवळ,
अदालत रोड,औरंगाबाद-४३१००१
फोन नं.०२४०-२३३११६१
Email.jtcc.au-mh@gov.in

Office of the Joint Charity Commissioner
Public Trust Registration Office,Near
baba Petrol Pump,Adalat Raod,Aurangabad.
Website.www.charity.maharashtra.gov.in
supdtest.au-mh@gov.in

---

**जा.क्र./आस्था/धसआ/ ४६/२०२३** **दि.०४/०१/२०२३.**

प्रती,
मा.धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

विषयः- कंत्राटी पध्दतीने शिपाई/पहारेकरी/सफाईगार भरणे बाबत जाहिर सुचना धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे बाबत.

मा.महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, धर्मादाय संघटनेच्या औरंगाबाद, नांदेड, जालना, परभणी व हिंगोली कार्यालयांसाठी शिपाई/पहारेकरी/सफाईगार यांची पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यासाठीची जाहिर निविदा सुचना जारी करण्यात आली असुन त्याची एक प्रत या पत्रासोबत जोडण्यात आली आहे.

तरी सदरील जाहीर निविदा सुचना धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी हि विनंती.

आपला विश्वासु,

(सु.ज.बिराणी)
धर्मादाय सह आयुक्त,
औरंगाबाद विभाग,औरंगाबाद.

# महाराष्ट्र शासन

## धर्मादाय सह आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे कार्यालय

धर्मादाय सह आयुक्त भवन,सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,बाबा पेट्रोल पंपाजवळ, अदालत रोड,औरंगाबाद-४३१००१
फोन नं.०२४०-२३३११६१
Email.jtcc.au-mh@gov.in

Office of the Joint Charity Commissioner
Public Trust Registration Office,Near baba Petrol Pump,Adalat Raod,Aurangabad.
Website.www.charity.maharashtra.gov.in
supdtest.au-mh@gov.in


---

जा.क्र./आस्था/धसआ/ ४७/२०२३ दि.०४/०१/२०२३.

## *निविदा सुचना*

मा.धर्मादाय सह आयुक्त, औरंगाबाद यांच्या अधिनस्त औरंगाबाद, नांदेड, जालना, परभणी व हिंगोली कार्यालयांसाठी शिपाई/पहारेकरी/सफाईगार पदावरील कर्मचारी पुरविण्यासाठी नोंदणीकृत ठेकेदार/कंपनी/संस्थेकडुन निविदा मागविण्यात येत आहे.

शिपाई/पहारेकरी/सफाईगार पदवार कंत्राटी पध्दतीने आवश्यक असलेल्या कर्मचाऱ्याचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | आवश्यक असलेल्या शिपाई/ पहारेकरी/ सफाईगार पदावरील कर्मचाऱ्यांची संख्या |
|---|---|---|
| ०१ | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद | २ |
| ०२ | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नांदेड | २ |
| ०३ | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जालना | ३ |
| ०४ | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी | २ |
| ०५ | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,हिंगोली | १ |
| | **एकुण** | **१०** |

## *सदरील निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.*

१.निविदे सोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रे साक्षांकित असावीत.

२.निविदा धारकास अस्तित्वात असलेल्या अनुषांगिक सर्व कायद्यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

३.खाजगी कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनांची रक्कम प्रचलीत दरानुसार मुख्य मालक म्हणुन या कार्यालयातर्फे आपल्या दरात समाविष्ठ करुन त्याचा भरणा संबंधीत कार्यालयात केल्याची पावती या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४.खाजगी कर्मचाऱ्याची वयोमार्यादा कमीत कमी १८ वर्ष व जास्तीत जास्त ३८ वर्ष राहील.

५.खाजगी कर्मचाऱ्याचे शिक्षण किमान १२ वी पास असणे आवश्यक आहे. त्याच बरोबर विशेष शिक्षण जसे की टंकलेखन व संगणक अनुभव असणाऱ्या खाजगी कर्मचाऱ्यास प्राधान्य देण्यात यावे.



६.व्यसनाधीन, गुन्हेगारी पार्श्वभुमी असणाऱ्या खाजगी कर्मचाऱ्यास नियुक्ती देता येणार नाही. खाजगी कर्मचारी नियुक्ती पुर्वी अशा कर्मचाऱ्यास चारित्र्य पडताळणी करुण घेणे बंधनकारक राहील.

७.बेशिस्त वर्तन करणाऱ्या कर्मचाऱ्यास या कार्यालयाने निर्देशित केल्यावर त्वरीत काढुन घ्यावे लागेल.

८.खाजगी कर्मचाऱ्यांना आठवडी सुटी देणे बंधनकारक राहिल. किमान वेतनामध्ये साप्ताहीक सुट्टीचा समावेश असेल.

९.सदरील कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे वार्षीक बोनस देणे कंत्राटदाराची जबाबदारी राहील.

१०.सदरील कर्मचाऱ्यांचा अपघात झाल्यास खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच कर्मचाऱ्याकडुन कार्यालयास/ इतरास नुकसान झाल्यास खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

११.नियमीत आस्थापनेवरील कर्मचाऱ्यास मिळणारे कोणतेही फायदे कंत्राटी कर्मचाऱ्यांना देय राहणार नाही.

१२.कुठलेही कारण न देता, कुठल्याही वेळी कंत्राट रद्द करण्याचे सर्व अधिकार धर्मादाय सह आयुक्त, औरंगाबाद यांना असतील.

१३.कंपनी/एजन्सी/संस्थेतर्फे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व या कार्यालयावर राहणार नाही.

१४.निविदा मंजुर झाल्यावर कंत्राटदारास या कार्यालयाशी करार करावा लागेल.

१५.निविदा अर्ज पांढऱ्या कागदावर टंकलिखीत करुन ज्या कार्यालयासाठी निविदा भरण्यात येत आहे. त्या कार्यालयाचे नाव,शिपाई/पहारेकरी/सफाईगार पदाच्या सेवेसाठी माणसी दर नमुद करुन दिनांक.१९.१.२०२३ पर्यंत वरील पत्यावर कार्यालयीन वेळेपुर्वी बंद लिफाफ्यात मा.धर्मादाय सह आयुक्त औरंगाबाद यांचेकडे सादर करावी. बंद लिफाफ्यात शिपाई/पहारेकरी/सफाईगार पदासाठीची निविदा असे नमुद कराणे आवश्यक आहे.

१६.सदरील निविदा सुचना http://charity .maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

दिनांक :-०४/०१/२०२३
ठिकाण:-औरंगाबाद

धर्मादाय सह आयुक्त,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

प्रत- १.कार्यालयीन नोटिस बोर्ड.
२.http://charity.maharashtra.gov.in या संकेत स्थळासाठी.